# GOVERNMENT OF BHOR STATE

## ACT.

[ ACT 1 OF 1342 FASLI. ]

1932.

# GOVERNMENT OF BHOR STATE ACT.

( Huzur Office Order No. 5 of 1342 Fasli ).

1. Whereas we have made a solemn and public declaration of our intention in our speech on 19th August 1922 of gradually and progressively associating leaders and representatives of people with the administrative machinery of the State and thus govern- the State on modern and liberal lines, and

2. Whereas to substantiate this intention

(a) on the one hand, with a view to derive help from and advantage of joint views and deliberations in the disposal of important matters in the routine work of the various branches of State administration, an Executive Council has been established since 18-8-25, &

(b) on the other hand, with the aim of popular-rising the administration of the State in general, a Legislative Council has also been introduced, as part of the State machinery, by Huzur Order No. 20 promulgated on 18-8-28, and

3. Whereas with the end in view of initiating the subjects in the art of managing their own affairs, Local Self-Government institutions, like Municipality, Notified Area Committee, Sanitary Board etc, have been started since 1922 A D., and

4. Whereas recently in our speech in the 7th Session of our Legislative Council on the 27th of January 1932, we have announced Responsible Government to be the goal of our policy, and

5. Whereas to serve as a first step in the working out of the ultimate ideal and to provide the subjects with still more wide training ground for the exercise of democratic rights, Taluka Local Boards have been newly launched on 7th June 1932, and

6. Whereas the above beginnings, made in the direction of bringing the State administration into a line with the modern and civilized forms and methods of Government and thereby facilitating the realisation of the cherished goal of our policy, have been found to be beneficial,

7. Now therefore, in commemoration of this the tenth anniversary day of our accession, to give a permanent and statutory basis to the aforesaid goal of our policy and to consolidate the varied institutions founded, in the interest of good Government, up-to-now for its achievement and also to provide a constitutional ground for their development in future and for the establishment of similar other institutions that would have to be hereafter brought into being, if and whenever needful and desirable, by timely enactment of laws or promulgation of orders, regulations or rules, in consonance with the changing trend of times and altered conditions, the legitimate aspirations, increasing capacities and real co-operative spirit of the subjects and our own accepted and oft-repeated aims of securing the peaceful and orderly progress of the State and the welfare of our subjects, it is thought expedient to enact the following law and give our sanction to its publication.

Bhor 18th August 1932.

**R. S. Pant Sachiv.**
Chief of Bhor.

## GOVERNMENT OF BHOR STATE ACT.

( Act I of 1342 Fasli. )

( An Act to provide a constitution for the Government of the Bhor State. )

*( Promulgated by Shrimant Raghunathrao Shankarrao alias Babasaheb Pandit Pant Sachiv, Chief of Bhor, on Thursday the 18th of August 1932, the tenth anniversary day of his accession. )*

Whereas it is expedient to give a permanent and statutory basis to the goal of the Chief of Bhor's administrative policy and the methods of realising the same, it is hereby enacted as follows: —

## PART 1.

### Preliminary

SHORT TITLE.

1. This Act shall be called the Government of Bhor State Act No. 1 of 1342 Fasli. ( 1932-33 A. D. )

EXTENT AND COMMENCEMENT.

2. It shall come into operation at once from the date of its promulgation i. e. 18th August 1932 and shall apply to the whole of the Bhor State.

### Definitions.

RULER OF BHOR OR CHIEF OF BHOR OR PANT SACHIV OF BHOR.

3 The words " Ruler of Bhor " or " Chief of Bhor " or " Pant Sachiv of Bhor " denote the Sovereign for the time being of the territory or territories of the Bhor State.

BHOR STATE.

4. The words " Bhor State " denote the territories which are or may become vested in the Chief of Bhor.

HUZUR.

5. " Huzur " means the Chief of Bhor, or the person or persons to whom he may, under special circumstances, delegate his powers of State administration.

BHOR DARBAR. 6. The "Bhor Darbar" shall mean the Chief of Bhor ordinarily with the Executive Council of the State, or alone.

EXECUTIVE COUNCIL 7. The "Executive Cuuncil" means a Body of High Officials of the State chosen by the Chiefsaheb to help him, jointly or severally, in carrying on the general routine business of the administration of the State.

THE LEGIS--LATIVE COUNCIL. 8. The "Legislative Council" means a Body of State Officials and non-Officials instituted by the Chiefsaheb to assist him in matters of Legislation, by making recommendations for the same, or others that are or may be entrusted to them.

THE TALUKA LOCAL BOARD. 9. The "Taluka Local Board" means a Body of Officials in the State and non-Officials in the Taluka set up in each Taluka of the State to exercise powers, perform duties and manage all such affairs as are or may be handed over to them regarding the subjects of local interest assigned to their management.

## PART. II.

---

### Administration.

10. Responsible Government is the ultimate goal of the Chiefsaheb's administrative policy.

11. The goal is to be achieved, in the ordinary cource of things, by successive stages of a gradually progressive policy, the time and manner of each advance being in the determination of the Chiefsaheb alone.

12. In the interest of good Government, the Chief of Bhor shall ordinarily carry on the administration of the State, as far

as possible and desirable, with the aid of the Executive Council and

(A) the Representative Institutions like the Legislative Council, the Taluka Local Boards etc., which have been established at present, and also of

(B) similar other Institutions which will be established in the State hereafter, if needful, in due time.

13. It is exclusively in the powers of the Chief of Bhor to enact laws, promulgate orders or frame rules & regulations-creative amendatory, abrogatory or otherwise-whenever necessary, regarding the constitution, powers and duties as well as the business procedure of (a) the institutions referred to in Section 12 A above or (b) those that would be hereafter set up in exercise of the powers given under Section 12 B above.

14. Notwithstanding the introduction of the above institutions or of similar other that would be brought into being and introduced in future as parts of the general administrative machinery of the State, the inherent administrative ( i. e. those concerning legislation, justice, execution, peace and order etc. ) powers of the Chiefsaheb, upon whom solely lies as the last resort the responsibility for the well-being and advancement of the subjects as well as for leading them on to the promised goal by a systeem of peaceful, orderly and reformed Government, shall in no way be curtailed.

15, The Chief of Bhor as the Ruler of the State shall, during any contingency, have power to appoint a person or body of persons to exercise all or any of his powers and to frame rules for the exercise of the powers so entrusted.

## PART III.

---

### Supplemental.

16. In cases of doubt regarding the meaning of the words

or terms used in this Act, the Chiefsaheb's interpretation of them shall be final.

17. The Chiefsaheb of Bhor reserves to himself the power of making amendments to this Act.

---

## ( भाषांतर. )

## भोर संस्थान राज्यकारभाराबाबतचा कायदा.

### हुजूर ऑफिस हुकूम नंबर ५ सन १३४२ फसली.

१ ज्याअर्थी आह्मी आपल्या संस्थानविषयक राज्यकारभारांत रयतेचे पुढारी व लोकप्रतिनिधी यांना हळूं हळूं व वाढत्या क्रमानें अंशभागी करून, संस्थानचा राज्यकारभार अर्वाचीन व प्रगतिपर धोरणानें चालविण्याचा आपला उद्देश ता. १९ ऑगस्ट सन १९२२ इसवीच्या भाषणांत जाहीर रीतीनें व्यक्त केला आहे, व

२ ज्याअर्थी हा उद्देश कृतींत उतरविण्याकरितां,

(अ) राज्यकारभाराचे नित्याचें कामकाजांत आह्मास महत्वाच्या बाबींमध्यें सल्लामसलत मिळून मदत होण्यास्तव ह्मणून आह्मीं ता. १८ ऑगस्ट सन १९२५ इसवी रोजीं कार्यकारी-मंडळ स्थापन केलें आहे, व

(ब) राज्यकारभाराशीं रयतेचा परिचय व्हावा ह्मणून आह्मीं ता. १८ ऑगस्ट सन १९२८ इसवी रोजीं दप्तरीं ठराव नं. २० सन १३३८ फसली अन्वयें कायदेमंडळ स्थापन केलें आहे, व

३. ज्याअर्थी रयतेस आपल्या स्थानिक कारभाराचें शिक्षण घेतां यावें म्हणून म्युनिसिपॅलिटी, नोटिफाईड एरिया कामिटी, सॅनिटरी बोर्ड वगैरे स्वरूपांच्या स्थानिक स्वराज्य संस्था सन १९२२ इसवीपासून संस्थानांत निर्माण करण्यांत आल्या आहेत, व

४. ज्याअर्थी आमच्या संस्थानच्या कायदेमंडळाच्या सातवें अधिवेशनाच्या वेळीं ता. २७ जानेवारी सन १९३२ इ. रोजीं आह्मीं आपलें भाषणांत आमच्या राज्यकारभाराचें अंतिम ध्येय " जबाबदार राज्यपद्धति " हें असल्याचें जाहीर केलें आहे, व

५. ज्याअर्थी हें अंतिम ध्येय साध्य होण्यास प्रारंभ म्हणून व लोकनियंत्रित राज्यपद्धतीमधील स्थानिक स्वायत्त-संस्थांच्या कामकाजाचा अनुभव घेण्यास, तसेंच अशा संस्थांचे हक्क वहिवाटण्याचें व जबाबदाऱ्या पार पाडण्याचें शिक्षण मिळविण्यास रयतेस अधिक विस्तृत क्षेत्र मिळावें या हेतूनें संस्थानांत तालुका लोकल बोर्डें ता. ७ जून सन १९३२ इ. पासून अस्तित्वांत आणलीं आहेत, व

६. ज्याअर्थी आमची राज्यपद्धति आधुनिक व सुधारलेल्या राज्यपद्धतीशी जुळती व्हावी व आमचें वरील ध्येय साध्य होण्यास मदत व्हावी ह्मणून वर दिग्दर्शित केलेल्या विविध संस्था स्थापन करणेचा प्रारंभीचा चालू क्रम हितकारी असल्याचें आमच्या अनुभवास आलें आहे,

७. त्याअर्थी आमच्या उपर्युक्त अंतिम ध्येयास सनदशीर आधार असणें, तसेंच तें ध्येय साध्य होण्यास, सुराज्य-साधनाच्या दृष्टीनें, हल्लीं अस्तित्वांत आणलेल्या वरील संस्थांचें एकत्रीकरणास व भावी वाढीस व शिवाय आमच्या प्रजेचें कल्याण व्हावें आणि शांतता-युक्त सुव्यवस्थेच्या मार्गानें संस्थानची प्रगति व्हावी यासंबंधीं आह्मांस संमत असलेल्या व वेळोंवेळीं आह्मीं उच्चारलेल्या हेतूच्या सिध्यर्थ, त्याचप्रमाणें आमच्या प्रजेच्या न्याय्य आकांक्षा प्रजेची वाढती लायकी व तिचे खऱ्या सहकार्याचें धोरण यांच्या अनुरोधानें आणि बदललेल्या कालमानास व परिस्थितिस अनुसरून, इष्ट व जरूर त्यावेळीं, कायदे, कानू अगर नियम वगैरे करून अशाच प्रकारच्या नव्या संस्था यापुढें स्थापन करण्यास शाश्वत व कायदेशीर आधार असणें आह्मांस योग्य वाटत आहे,

म्हणून, आमच्या दशम वार्षिक राज्यारोहण दिनाच्या स्मरणार्थ, खालील कायदा करून त्याच्या प्रसिद्धीस आम्ही मंजुरी देत आहोत.

| | |
|---|---|
| भोर, ता. १८ ऑगस्ट सन १९३२. | R. S. Pant Sachiv. संस्थानाधिपति, भोर. |

# भोर संस्थान राज्यकारभाराबाबतचा कायदा

## ( सन १३४२ फ. चा १ ला. )

---

### ( भोर संस्थानच्या राज्यकारभाराचे घटनेसंबंधीं केलेला कायदा. )

( श्रीमंत रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासाहेब पंडित पंतसचिव संस्थानाधिपति भोर यांच्या दशम वार्षिक राज्यारोहणाचे दिवशीं, म्हणजे गुरुवार ता. १८ माहे ऑगस्ट सन १९३२ इसवीं रोजीं, त्यांच्याच हुकूमानें प्रसिद्ध झाला.)

ज्याअर्थी भोर संस्थानाधिपतींच्या राज्यकारभाराच्या अंतिम ध्येयास व तें साध्य करण्याच्या पद्धतीस शाश्वत व कायद्याचा आधार असणें योग्य आहे, त्याअर्थी खालील प्रमाणें कायदा करण्यांत येत आहे:-

## भाग १ ला.

---

### प्रारंभीचीं कलमें.

संक्षिप्त नांव. १. या कायद्यास " भोर संस्थानच्या राज्यकारभाराबाबतचा सन १३४२ फ. ( सन १९३२-३३ इ. ) चा १ ला कायदा " असें म्हणावें.

व्याप्ति व सुरुवात. २. हा कायदा सर्व भोर संस्थानास लागू असून, तारीख १८।८।३२ इ. पासून तो अमलांत येईल.

## व्याख्या.

भोर संस्थान — ३. "भोर संस्थान" म्हणजे भोर संस्थानाधिपतींचे अमला-खालीं हल्लीं असलेला अगर पुढें येणारा मुलूख.

भोरचे पंतसचिव अगर संस्थानाधिपति, भोर अगर चीफ ऑफ भोर. — ४ "संस्थानाधिपति, भोर" किंवा "चीफ ऑफ भोर" किंवा "भोरचे पंतसचिव" म्हणजे भोर संस्थानावर अंमल चालविणारी गादीनशीन व्यक्ति.

हुजूर. — ५. "हुजूर" म्हणजे सरकार श्रीमंत राजेश्री पंतसाहेब सचिव किंवा ते आपले अधिकार प्रसंग विशेषीं ज्याकडे सोपवितील ते.

भोर दरबार. — ६ "भोर दरबार" म्हणजे सामान्यतः भोर संस्थान कार्यकारी मंडळासह भोर संस्थानाधिपति अथवा भोर संस्थानाधिपति खुद्द.

कार्यकारी मंडळ. — ७. "कार्यकारी मंडळ" ( Executive Council ) म्हणजे भोर संस्थानच्या राज्यकारभारांतील खातेंनिहाय नित्याच्या पण महत्वाच्या कामाबाबत श्रीमंत सरकार पंतसाहेब सचिव यांस सल्लामसलत देऊन मदत करण्यास नेमिलेलें वरिष्ठ अधिकारी–मंडळ.

कायदेमंडळ. — ८. "कायदेमंडळ" ( Legislative Council ) म्हणजे भोर संस्थानाधिपतीस राज्यकारभाराबाबत कायदे, कानू, नियम इत्यादि तयार करण्याचें कामीं किंवा इतर कामासंबंधीं शिफारस करणारें सरकारी व बिन-सरकारी सभासदांचें मंडळ.

तालुका लोकल बोर्ड. — ९. "तालुका लोकल बोर्ड" म्हणजे भोर संस्थानांतील प्रत्येक तालुक्यांत त्या त्या तालुक्यापुरती भोर संस्थानाधिपतीनें सन १३४१ फ. च्या ५ व्या कायद्याप्रमाणें सध्या नेमून दिलेली अथवा पुढें दिलीं जाणारीं कामें करण्यास स्थापन केलेली सरकारी व तालुक्यांतील बिन-सरकारी सभासदांची संस्था.

# भाग २ रा.

---

## राज्यकारभारासंबंधीं.

१०. "जबाबदार राज्यपद्धति" हें भोर संस्थानाधिपतींच्या राज्य कारभाराचें अंतिम ध्येय आहे.

११. हें अंतिम ध्येय हळुहळु पण वाढत्या प्रगतिच्या क्रमानें, सामान्य परिस्थितींत, साध्य करून घेण्याचें आहे; व तसें करतांना, प्रगतिचें पाऊल कोणते-वेळीं व कशा प्रकारें टाकावयाचें तें सर्वस्वी संस्थानाधिपतीनें ठरविण्यांतलि आहे.

१२. सुराज्यास्तव भोर संस्थानाधिपति, शक्य व इष्ट तोंपर्यंत, सामान्यतः आपला राज्यकारभार कार्यकारीमंडळाच्या मदतीनें, तसेंच

(अ) तालुका लोकलबोर्डें, कायदेमंडळ इत्यादि सध्या अस्तित्वांत असलेल्या प्रातिनिधिक संस्थांच्या व त्याचप्रमाणें,

(ब) अशाच स्वरूपाच्या ज्या संस्था, योग्यप्रसंगीं जरूर तेव्हां, यापुढें स्थापन करणेंत येतील, त्यांच्या साहाय्यानें चालवितील.

१३. या कायद्याच्या कलम १२ (अ) अगर (ब) मध्यें दिग्दर्शित केलेल्या संस्थांच्या घटना, अधिकार व कर्तव्यकर्में याबाबत, तसेंच त्यांच्या कार्यपद्धति-संबंधि —अवश्य असेल त्या वेळीं— सर्व प्रकारचे कायदे, कानू, नियम, ठराव वगैरे करण्याचा अधिकार भोर संस्थानाधिपतींसच आहे.

१४. कलम १२ यांत दिग्दर्शित केलेल्या ( रयतेस राज्यकारभाराचें कामीं अंशभागीं करण्यास ह्मणून संस्था ) स्थापन केल्या असल्या, तरी त्यांच्या योगानें भोर संस्थानाधिपतींचे राज्यकारभाराबाबतचे कायदे करणें, न्याय-निवाडे करणें, त्यांची अंमल बजावणी करणें, शांतता व सुव्यवस्था राखणें वगैरे संबंधीचे स्वयंभू अधिकार कोणतेही रीतीनें यत्किंचितहि मर्यादित होत नाहींत. कारण, प्रजेचें कल्याण व प्रगति करण्याची व प्रजेस आपलें इष्ट ध्येय साध्य करून देण्याची अंतिम जबाबदारी संस्थानाधिपतीवरच आहे.

१५. भोर संस्थानाधिपतींस प्रसंगविशेषीं आपले कांहीं अथवा सर्व

अधिकार चालविण्याकरितां प्रतिनिधी नेमण्याचा व त्यांनीं काम कसें रीतीनें करावें या बाबत नियम करण्याचा अधिकार आहे.

# ाग ३ रा.

---

## पुरवणी.

१६. या कायद्यांतील शब्दांचे किंवा संज्ञांचे अर्थाबद्दल संशय अथवा वाद उपस्थित झाल्यास, त्याचा निर्णय भोर संस्थानाधिपति देतील तोच अखेरचा होय.

१७. या कायद्यांत दुरुस्त्या करण्याचा आधिकार श्रीमंत पंतसाहेब यांनीं आपणाकडे राखून ठेविला आहे.

---